

Pune, Vol.: 6, 3rd issue, March 2025
(Monthly), Price: 100/- Pages: 46

प्रिय आई-बाबा

"घाबरगुंडी"हा थोडा वेगळा विषय अंकातून घेऊन येत आहोत. भीतीची भावना नैसर्गिक आहे. स्वसंरक्षणासाठी ती गरजेची आहे. अगदी चिमुरडी मुलंसुद्धा जोपर्यंत त्यांना सुरक्षित वाटत नाही तोपर्यंत अनोळखी व्यक्तीकडे जात नाहीत. सतर्क राहून, अंदाज घेऊन, निर्णय घेणं भीतीमुळे शक्य होतं. पण जेव्हा नको त्या गोष्टींची भीती बसते किंवा घातली जाते तेव्हा मुलांच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम होतो. अंधाराची, भुताची, प्राण्यांची, पाण्याची, एकटं राहण्याची, मोठ्या माणसांची, अनोळखी जागेची, अभ्यासाची, देवाची, आजाराची अशा कितीतरी भीती प्रत्येकात दडून बसलेल्या असतात. आपलं काम सोपं व्हावं यासाठी वॉचमनकाकांची, बागुलबुवाची भीती आपणच घालतो. अशा भीतींमुळे मुलांचा आत्मविश्वास कमी होतो. आपली मुलं निर्भय, जबाबदार, आनंदी असावीत यासाठी त्यांना आपला आधार वाटला पाहिजे, सोबत मिळाली पाहिजे.

अंकातल्या भीतीच्या गंमतशीर गोष्टी, गाणी मुलांना आणि मोठ्यांनाही आवडतील. भीतीला वाट करून देणाऱ्या काही ॲक्टिव्हिटीजदेखील अंकात आहेत. भुताच्या गोष्टी ऐकायला मुलांना आवडतात, त्यासुद्धा अगदी हलक्याफुलक्या आहेत. चित्रं बघताना, गोष्टी वाचताना भीती वाटण्यापेक्षा मजा कशी येईल याचा विचार केला आहे. तरीदेखील मुलांना एखाद्या पानावर थांबावंसं नाही वाटलं तर पुढच्या पानावर जाऊ या. अंकाच्या निमित्ताने आपल्या आणि मुलांच्या भीतीचा विचार केला जाईल, गप्पा होतील, तोडगे सुचतील. तुमच्या प्रतिक्रिया, सूचना, प्रश्न नक्की कळवा.

अमृता कावणकर
Editor, Co-Founder

जुई चितळे
Co-Editor



-डॉ. श्रुती पानसे

डॉ. हॉवर्ड गार्डनर यांच्या "theory of multiple intelligences" नुसार प्रत्येकाच्या मेंदूत ८ वेगवेगळ्या बुद्धिमत्ता असतात. मात्र या आठपैकी दोन किंवा तीन बुद्धिमत्ताच ठळक असतात. अगदी लहानपणापासूनच मुलांना या आठही बुद्धिमत्तांचे अनुभव मिळाले तर हळूहळू निरीक्षणांतून मुलांचा कल कोणत्या बुद्धिमत्तांमध्ये आहे हे शोधता येऊ शकतं. प्रत्येक अंकातून एकेका बुद्धिमत्तेविषयी आपण थोडंसं जाणून घेणार आहोत.

व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्ता

ही बुद्धिमत्ता ठळक असलेल्या व्यक्तीचा सतत स्वतःशी संवाद सुरु असतो. एखाद्या घटनेचा ती खोलवर विचार करते, त्याचा भविष्यकालीन वेधही घेते. लेखक, विचारवंत, संशोधक, नवीन राग शोधून काढणारे शास्त्रीय गायक यांमध्ये ही बुद्धिमत्ता असते. फार लहानपणी ही बुद्धिमत्ता कळून येईल, असं नाही. पण हळूहळू मूल मोठं होईल तसा या बुद्धिमत्तेचा शोध लागू शकतो. स्वतःचा शोध घेतल्यावर आपल्यात ही बुद्धिमत्ता आहे का याचा थांग लागू शकतो. आपल्या भावना समजून घेणं या बुद्धिमत्तेमुळे शक्य होतं. भीती हीदेखील एक भावनाच आहे. "किती घाबरट आहेस!" असं न म्हणता "भीती वाटू शकते, पण आपण त्या भीतीला हरवू शकतो," अशा प्रकारचा मुलांशी आपला संवाद हवा. मग तो गोष्टीत असेल, गप्पांमधून असेल किंवा दुसऱ्या कोणाच्या उदाहरणांमधून असेल. भावनांच्या संदर्भातील ॲक्टिव्हिटी पान क्र २९ वर दिली आहे. ती मुलांसोबत नक्की करून बघा.

भीती झाली छोटी

संकल्पना - गौरी जानवेकर
चित्रं- शुभम लखेरा



मुलगा म्हणाला, "बापरे! खोलीत अंधार आहे."



आई म्हणाली, "चल, आपण दोघे जाऊ! हे बघ, काहीच नाहीये. हा पलंग आणि हे कपाट आहे."



आई म्हणाली, "आता मी बाहेर थांबते, तू आत जाऊन ये." मुलगा म्हणाला, "आई, मी आलो एकटा आत!"

मुलगा म्हणाला, "ऊई... माऊ आली. पळा!!"



बाबा म्हणाला, "माऊचे डोळे, जीभ, शेपूट, दात बघ."



बाबा म्हणाला, "तूपण चित्राला हात लाव!"



बाबा म्हणाला, "ही बघ खरीखरी माऊ. मी हात लावला. तू लावतोस?"



मुलगा म्हणाला, "आत्ता नको. नंतर लावतो."

पालकांसाठी - मुलांना वाटणारी भीती मान्य करून म्हणजे acknowledge करून, काही कृतींमधून, बोलून, हळूहळू भीती कमी होईल यासाठी प्रयत्न करता येतात. भीती कदाचित पूर्णपणे जाणार नाही पण भीतीला सामोरं जाणं. भीती वाटत असतानाही कृतिशील राहणं यासाठी मदत होऊ शकेल.

ज्युनियर

चिमणी चित्रं

- आभा भागवत


तुला कशाकशाची भीती वाटते, आई किंवा बाबाला सांग. त्यातल्या दोन गोष्टींची चित्रं एक-आड-एक काढ. मला झुरळ आणि भुताची भीती वाटते. चित्र रंगव आणि दुसऱ्या साध्या कागदावर असंच चित्र काढून रंगव आणि चित्र फाडून फेकून दे.



पालकांसाठी - छोट्या मुलांकडून रेखीव चित्राची अपेक्षा नको. त्यांना हवं तसं काढू देऊ. वेगळ्या साध्या कागदावर भीतीचं चित्र काढून फाडून फेकून दिल्याने भीती जायला मदत होते. मुलांसोबत तुम्हीसुद्धा असं चित्र जरूर काढा.

अट्टू आणि गट्टू

कविता - पारंपरिक
चित्र - अंबिका करंदीकर



एक होता अट्टू, एक होता गट्टू.
अट्टू आणि गट्टू फिरायला चालले;
फिरायला चालले, फिरायला चालले
जाता जाता चालले जंगलातून

जंगलात दिसली छोटीशी झुडपं,
छोट्याश्या वेली, मोठी झाडं;
झाडावर चढता येईचना !

जंगलात दिसला छोटासा ओढा,
छोटंसं तळं, मोठी नदी;
पाण्यात पोहता येईचना!

जाता जाता दिसली छोटीशी टेकडी,
छोटासा डोंगर, मोठा पर्वत;
पर्वतावर चढता येईचना!

जंगलात ऐकली कोल्ह्याची कोल्हेकुई,
वाघाची डरकाळी, सिंहाची गर्जना;
भीतीने पळता येईचना!

अट्टू आणि गट्टू फारच भ्यायले,
रडायला लागले, पळायला लागले;
घराची वाट काही सापडेना...



तिकडून आले घोडेदादा
टपटप टपटप घोडेदादा;
अट्टू गट्टू बसले घोड्यावर

अट्टू आणि गट्टू हसायला लागले!
हसायला लागले, हसायला लागले


टपटप चालले घोडेस्वार
टपटप चालले घोडेस्वार...

QR कोड स्कॅन
करून हे गाणं ऐक.

चित्र कोडं

-दीप्ती देशपांडे
चित्र - अमृता वझे


चित्रं बघून नावं लिही किंवा
आईबाबांना लिहायला सांग.



मज्जा बिज्जा

चित्र - अमृता वझे

सारख्या दिसणाऱ्या या चित्रांमधली वेगळी चित्रं शोध.






तू सांग बरं!

माझ्याकडे तीन पाळीव प्राणी, पक्षी आहेत. तिघांचे मिळून ८ पाय आहेत. प्रत्येक पेट हा कुत्रा नाहीतर पक्षी आहे. माझ्याकडे किती कुत्रे आणि किती पक्षी आहेत?

चौकोन रंगवून वटवाघूळ काढ.




कुठल्या चित्राची कुठली सावली? जोड्या लाव. अंधारात टॉर्च लावून हातांनी भिंतीवर सावल्या पाडून बघ.



''१०, २०, ३०, ४०, ५०, ६०, ७०, ८०, ९०... १००... मी आलेSSS'' फिशिराने डोळे उघडले आणि ती तिच्या लपलेल्या मित्रांना शोधायला लागली. तिला कोणीच दिसत नव्हतं. इकडे तिकडे पोहत शोधताना ऑक्टीचा एखादा पाय दिसेल किंवा टम्पू तर कुठूनही दिसेल एवढा मोठा आहे असं तिला वाटलं होतं. पण आत्ता कोणीही दिसेना. ती पोहत पलीकडच्या मोठ्या खडकापाशी गेली. आणि हळूच मागे जाऊन पाहते तर काय? टम्पू, ऑक्टी आणि किरो तिघेही तिथे होते... पण आपण लपाछपी खेळत होतो हे विसरूनच गेले होते ते सगळे. तिघेही प्रचंड घाबरलेले दिसत होते. त्यांच्या मागे आणखी कोणीतरी होतं! वळवळणारा, सळसळणारा एक सापासारखा दिसणारा मासा तिथे होता. त्याचे रोखून बघणारे डोळे, विचित्र तोंड भयानक दिसत होतं.

त्याची शिकार तो शोधत होता. वेगाने इकडे तिकडे पोहताना त्याला एक छोटा लाल मासा दिसला.



फिशिरा®


गोष्ट - जुई चितळे
चित्र - ओंकार बागवे

त्याने त्या लाल माशाला आपल्या शेपटीने हळूच स्पर्श केला. त्याबरोबर तो लाल मासा शॉक बसून बेशुद्ध झाला. हे बघून सगळेच घाबरले.

ऑक्टी जोरात ओरडला, ''बापरे ... हा इलेक्ट्रिक ईल मासा आहे...''

ऑक्टीचं ओरडणं ऐकून ईल आता वेगाने यांच्याकडे यायला लागला. पोटातली काळी शाई पाण्यात भसकन सोडून ऑक्टी तर पटकन पळूनच गेला. टम्पू खरं तर त्या ईलपेक्षा एवढा मोठा तरीही तो काही न सुचून तसाच घाबरून उभा राहिला.

टम्पूच्या मागे खडकाजवळ असलेल्या फिशिरा आणि किरो पण कुठेच जाऊ शकणार नव्हत्या. कुठे जायला जागाच नव्हती.




आता काय होणार? आपल्याला हा शॉक देऊन खाऊन टाकणार की काय? आणि आपण काहीच करू शकणार नाही? असा विचार आल्याबरोबर फिशिरा घाबरणं सोडून थोडी चिडलीच. पुढे येऊन ती जोरात ओरडली, ''ए... तू असशील इलेक्ट्रिक पण आम्हीसुद्धा काही कमी नाही. पकडूनच दाखव मला.'' असं म्हणून फिशिरा अतिशय चपळाईने तिथून पोहत निघाली आणि बाजूच्या कोरलच्या म्हणजे प्रवाळांच्या जंगलात घुसली. ईल चिडून तिचा पाठलाग करायला लागला. फिशिरा छोटीशी असल्यामुळे सुळकन इकडून तिकडे फटींमधून जात होती. तिच्या मागे जाता जाता ईलची शेपटी एका प्रवाळात अडकली.



तो आता अडकला आहे हे बघून फिशिरा पटकन टम्पू आणि किरोजवळ आली. ''चला, तो अडकला आहे तोपर्यंत लवकर घरी परत जाऊ.''
घरी पोचल्यावर आधीच तिथे पळून आलेला ऑक्टीसुद्धा त्यांना भेटला.''हुश्श्श... वाचलो बुवा त्या ईलच्या तावडीतून. फिशिरा तुझी कमाल आहे. तू त्याच्याशी लढायला गेलीस म्हणून आम्ही पण बचावलो.'' किरो म्हणाली. ''सॉरी मी तर पळूनच आलो.'' ऑक्टी म्हणाला.
''आणि मला तर काही सुचतच नव्हतं. पुढच्या वेळी असा कोणी शत्रू आला तर काय करायचं याबद्दल आपण एक-दोन प्लॅन्स आधीच तयार करून ठेवू या!'' टम्पू म्हणाला.
सगळ्यांनाच ते पटलं. ऑक्टी म्हणाला, ''पण सगळ्यात आधी फिशिरासाठी मस्त खाऊ गोळा करून आणू. आमच्याकडून तुला भेट. हिप हिप हुर्रे फिशिरा!!''

पालकांसाठी: भीती वाटल्यावर लढणे, पळून जाणे, गोठणे अशा तीन प्रकारच्या प्रतिक्रिया आपल्याकडून येऊ शकतात. स्वभाव, वय, परिस्थितीनुसार प्रत्येकाच्या प्रतिक्रिया वेगळ्या असतात. भीती वाटल्यावर काय करायचं याबद्दल मुलांशी गप्पा मारत राहायला हव्या.







एका चौकोनात 'भीती' हा शब्द लिही. त्याची आरशातली प्रतिमा शेजारच्या चौकोनात काढ. आता त्या सगळ्याचं प्रतिबिंब खालच्या चौकोनांत काढ. तयार झालेल्या आकृतीतून काहीतरी सुंदर रंगव. आता दुसरं असंच चित्र साध्या कागदावर काढून फाडून टाकून फेकून दे.

सिनियर

चिमणी चित्रं

पालकांसाठी - दृश्य-अवकाशीय बुद्धिमत्ता - मनातल्या विचारांना, भावनांना चित्रांतून कागदावर उतरवता येणं हे दृश्य अवकाशीय बुद्धिमत्तेमुळे शक्य होतं. मुलांना हवं तसं रंग, रेषांच्या माध्यमातून व्यक्त होऊ देऊ या, दर वेळी सुंदर चित्रंच आली पाहिजेत असा आग्रह नको धरायला.

- आभा भागवत

काळा रंग

- उर्मी दांडेकर (वय ८ वर्ष) | चित्र - स्मृती मुदगल



एक गाव होतं. गावातल्या सगळ्यांची एकमेकांशी मैत्री होती. पण फक्त एकच मुलगा होता. तो नेहेमी एकटा राही. त्याला काळा रंग आवडायचा नाही. त्याला वाटायचं, ''काळा हा रंग सगळ्यांचा शत्रू आहे. तो सगळं वाईट करतो.''

सगळ्यांनी त्याला एकटं पाडलं होतं. काही दिवसांनी सगळ्यांना वाटलं, ''आपण या मुलाला आपल्यात घेऊ या. काळा रंग आपला शत्रू नाहीये. सगळे रंग छान आहेत. हे आपण त्याला सांगू या.'' गावातल्या मुलांनी त्याच्याशी मैत्री केली. पण तरीही त्या मुलाला काळा रंग शत्रूच वाटत होता.





सगळे मिळून एकदा रंगकाम करत होते. तो मुलगा काळ्या रंगाकडे पाहतही नव्हता. मग सगळ्यांना एक युक्ती सुचली. ते त्याला म्हणाले, आपण सगळे रंग मिसळून पाहू. आणि काय गंमत? रंग तयार झाला काळा!




तो मुलगा (मनात) म्हणाला, ''सगळे रंग चांगलेच आहेत. आणि त्यांच्यापासूनच काळा बनतो की. आपणही काळेच आहोत! मग काळ्यावर कशाला रागवायचं?'' तेव्हापासून त्याला काळा रंगसुद्धा आवडायला लागला.



गोष्ट - मृदुला अर्जुनवाडकर | चित्र - शुभम लखेरा

शंभर वर्षे जुनं एक गाव आहे. त्या गावाचं नाव आहे ''गुदुगुदु''. या गुदुगुदु गावात एक भूत होतं, म्हणजे आहे! ते खूप खूप जुनं आहे. त्याचं नाव आहे – ''गुदगुल्या बुंबा!'' त्याच्या नावावर जाऊ नका. हे नाव ऐकून हसायला बिसायला येईल तुम्हाला. पण हसलात तर तुम्ही फसलात. त्याच्या नावावरूनच या गावाचं नाव पडलंय ''गुदुगुदु गाव!'' गुदगुल्या बुंबा राहतो ते गुदुगुदु गाव! एरवी तो बुंबा तुम्हाला त्रास देत नाही मुळीच. पण त्याची चेष्टा केली, कुणी त्याची टर उडवली, की संपलं. मग सगळा खेळ खल्लास! तो तुम्हाला इतक्या गुदगुल्या करतो, इतक्या गुदगुल्या करतो की हसून हसून तुम्ही रडायला लागता. त्याच्या गुदगुल्यांना अख्खा गुदुगुदु गाव घाबरतो.



गावात एका बाजूला माळावर एक विहीर आहे. त्या विहिरीपाशी एक चिंचेचा पार आहे. त्या चिंचेच्या झाडावर हा गुदगुल्या बुंबा राहतो. पूर्वी त्या माळावर गुदगुल्या बुंबा आणि त्याचा भाऊ गुदगुल्या सुंबा राहायचे. दोघे मिळून खेळायचे, आनंदाने राहायचे.

एक दिवस ते असेच छान खेळत होते, खेळता खेळता सुंबा खाली पडला आणि एकदम गडप झाला. कुठे गेला ते कुणालाच कळलं नाही. बुंबा अगदी एकटा पडला. एकटाच चिंचेच्या झाडावर बसून राहायला लागला. गावातले सगळे त्याला घाबरायला लागले.''कोण जाणे कधी गुदगुल्या करेल आणि हसवून हसवून छळेल.'' गावातल्या मुलांना सांगून ठेवलं होतं की, ''काहीही झालं तरी विहिरीकडे फिरकायचं नाही.'' पण मुलंच ती, ती काही ऐकायची नाहीत. जायचाच कुणीतरी खेळता खेळता तिकडे आणि यायचा परत घरी... हसत-रडत, पाय टाकत फेंगडे फेंगडे.



एक दिवस काय झालं, शाळेनंतर पप्या आणि झंप्या दोघे खेळत खेळत गेले विहिरीपाशी. पाणी प्यायला झंप्याने शाळेच्या बॅगेतून डबा काढला. डब्याच्या कडीला दोरी बांधून अलगद तो डबा सोडला विहिरीत. पाणी डब्यात भरताच त्याने तो वर काढला. इकडे तोपर्यंत पप्याला झाडाला लागलेल्या चिंचा दिसल्या आणि त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. त्याने दगड घेतला आणि भिरकावला, त्याबरोबर थोड्या चिंचा खाली पडल्या. पप्याला भारी मजा वाटली. त्याने अजून एक दगड उचलला आणि नेम धरून चिंचांवर दिला भिरकावून! पण त्याचा चुकला नेम, झाला त्याचा गेम! लागला दगड झोपलेल्या गुदगुल्या बुंबाला, झोप मोडताच बुंबा आला रागाला! बुंबा म्हणाला, ''ए, कोण आहे रे तिकडे, कुणी मोडली माझी झोप?

ये समोर, बघ माझा राग, माझा कोप!''

ऐकून बुंबाचा आवाज, पप्याला फुटला घाम! पाणी पिता-पिता झंप्यापण घाबरला जाम. हात थरथरायला लागले, पाय लटलटायला लागले, घशाला पडली कोरड,

डोळे झाले ओले! काय करावे कळेना, पळायचेही सुचेना. अक्राळ विक्राळ अंग मोडत, गुदगुदल्या बुंबा उतरला खाली पानं झाडत. सापासारखा फांदीवरून खाली उलटा लटकला आणि आला समोर पप्याच्या. म्हणाला, ''तूच ना तो ज्याने मारला दगड? सुटका नाही तुझी तू लढायचंय तेवढे लढ!'' झंप्याने मध्येच दाखवले प्रसंगावधान. डब्यातले पाणी दिले बुंबाला छान.

''सोडून दे आम्हाला, नको रडवू आणि
झोप तू पुन्हा, पिऊन थोडे पाणी.
ठाऊक आम्हाला तू राहतोस एकटा
पण समज आम्हाला तुझा भाऊ धाकटा!''

गुदगुदल्या बुंबा झाला एकदम भावूक. म्हणाला त्याला, ''माझं दुःख तुला कसं ठाऊक? घाबरू नका, जाऊ नका, तुम्ही दोघे थांबा. खेळा इथे जसे खेळायचो मी आणि सुंबा!'' बुंबाचे दुःख पाहून झंप्याला वाटलं वाईट. पप्या आणि झंप्याने बुंबाला मिठी मारली टाईट. सुंबा कुठे गेला तो शोध आता सुरू, बुंबाचे दुःख आपण दूर करू!



गाण्याचा क्लास

कविता - वैशाली सूर्यवंशी
चित्र - चरित्रा वगळ



गाढव म्हणाले कोकिळेला,
''शिकव ना ताई गायला मला''
सुरू झाला मग गाण्याचा क्लास
वेळ होती पहाटेची खास

कोकिळेने लावला वरचा सा
गाढवाचा ओरडून बसला घसा
कोकिळेने घेतली सुंदर तान
गाढव ओरडत उंचावे मान

गाण्याचा सूर वर पोचला
पक्ष्यांना कळेना गोंधळ कसला?
पंख फडफडवीत कबुतर म्हणाले,
''कुणाचे पहाटे पोट उठले?''



साळुंकी म्हणे, ‘‘नाही नाही
बहुतेक भूकंपच झाला बाई!’’
खारुताई म्हणाली,‘‘ढग गडगडतायत,
पावसाळा मध्येच कसा काय आलाय?’’



कावळा म्हणे, ’’बोलू नका राव.
उगवल्यावर बघू झालंय काय.’’
कुणाचा आवाज कुणाला येईना
गाढवाचा आलाप मुळीच थांबेना

पक्षी सारे गोळा झाले
आवाज ऐकून भलतेच भ्याले
कोकिळेला मग केली विनंती
गाढवाचे गायन नको गं बाई

तुझा आवाज राहू दे झकास
बंद कर ताई हा गाण्याचा क्लास




QR कोड
स्कॅन करून
हे गाणं ऐक.

चिकू Piku

गोष्ट - पराग चितळे | चित्र - भक्ती दलाल


चिकू आज खूश होता. तो उत्साहात पळत पळत आला आणि पिकूला हाक मारायला लागला, ''पिकू पटकन ये, मला तुला एक गंमत दाखवायची आहे! मला एक नवीन मित्र मिळाला आहे! ये पटकन!'' पिकू झाडावरून एक गिरकी घेऊन झपकन खाली आली. ''अरे वा! नवीन मित्र? माझी ओळख करून दे!''



चिकू आणि पिकू घरामागच्या कुंपणापाशी आले. तिथे भिंतीला टेकून एक खिडकी होती. पिकू ती खिडकी बघून एकदम घाबरीघुबरी झाली. ''चिकू, तिथे उन्हात चमकणारी खिडकी आहे. मला तशी खिडकी नाही आवडत. मी इथे थांबते, तू तुझ्या मित्राला घेऊन ये.'' चिकू म्हणाला, ''अगं ये की, तो नवीन मित्र तिथेच राहतो. त्या खिडकीच्या आत.'' पिकू म्हणाली, ''मी नाही येणार. मला भीती वाटते तशा खिडकीची. मी तिच्या जवळ गेले की मला कुठे चालले आहे ते कळतच नाही.'' चिकू हसायला लागला, ''खिडकीला काय घाबरतेस! त्यात काहीच भीतीदायक नसतं. खिडकीतून आपल्याला नवीन काहीतरी दिसतं. अशी खिडकीची भीती वगैरे नसते. चल, खोटं नको सांगूस. मी जातोय तू ये.'' पिकूला ते ऐकून जरा वाईट वाटलं.


पिकूला उन्हात चमकणाऱ्या खिडकीची खरोखर भीती वाटत होती. उन्हामुळे तिला खिडकी नीट दिसायची नाही. ती बरेचदा उन्हात चमकणाऱ्या खिडकीला धडकून पडली होती. तिला कळेना की चिकूला कसं समजावून सांगायचं. विचार करता करता पिकूला एक कल्पना सुचली.

ती चिकूला म्हणाली, ''अरे, मला आत्ता आठवलं, मलासुद्धा तुला एक गंमत दाखवायची आहे. आपण ती पाहू आणि मग तुझ्या नवीन मित्राशी खेळायला येऊ. चालेल?''



चिकू खिडकीमधल्या मित्राला टाटा करून धावत आला. ''चल, मला ती गंमत पाहायची आहे. काय आहे?'' तो म्हणाला. पिकू म्हणाली, ''ये माझ्या मागे.''

पिकू उडत उडत जुन्या पाण्याच्या टाकीवर जाऊन बसली आणि म्हणाली, ''ये इथे! इथे आहे ती गंमत!'' त्या टाकीच्या एवढया सगळ्या पायऱ्या पाहून चिकू एकदम थांबला, ''बापरे! इथे तर पायऱ्या आहेत. मला पायऱ्या फार आवडत नाहीत. त्या उंच जागी घेऊन जातात आणि मी उतरताना घसरतो. तू ती गंमत खाली आण.''



पिकू म्हणाली, ''अरे, त्या तर फक्त पायऱ्या आहेत. त्यांना काय घाबरायचं? त्या चढून गेल्यावर आपल्याला आजूबाजूचं छान दिसतं. अशी पायऱ्यांची भीती वगैरे काही नसतं.''

चिकू ते ऐकून एकदम ओशाळला आणि म्हणाला, ''सॉरी पिकू, मी तुला काय वाटत आहे त्याचा विचारच नाही केला. माझी जशी भीती मला खरी आहे, तशीच तुझी भीतीसुद्धा तुला खरीच असणार.'' पिकू खाली आली आणि म्हणाली, ''थँक यू चिकू, तू खरंच चांगला मित्र आहेस. आपलं चुकलं हे कबूल करायला अवघड असतं. खरंतर वर काहीच गंमत नाहीये, तुला माझी भीती कळावी म्हणून मी तुला इथे घेऊन आले.''

चिकू म्हणाला, ''मग मीपण तुला गंमत सांगून टाकतो. त्या खिडकीत कोणी दुसरा मित्र नाहीये, ती खिडकी एक आरसा आहे. तो मीच आहे. तुझी फजिती करायचा प्लॅन होता पण तुझ्या भीतीने माझीच फजिती केली.'' दोघेही खूप हसले आणि म्हणाले, ''सगळ्यांना किती वेगवेगळ्या गोष्टींची भीती वाटत असेल ना?'' ''चल आपण ठुल्लू मांजरीला विचारू तिला कशाची भीती वाटते!'' ठुल्लूला कसली भीती वाटत असेल बरं?



धाबरगुंडी

-श्रावणी उभे
चित्र - भक्ती दलाल




जंतर मंतर भीती गायब


कविता - विद्याधर शुक्ल
चित्र - सानिका देशपांडे

जमिनीवर पाल टपकते
येईल अंगावर भीती वाटते
मोती भू-भू गुर-गुर करतो
चावेल मला भीती वाटते

स्वप्नांत येतो शिंगु राक्षस
झोपेत माझी जाम टरकते
घाबरत घाबरत जातो अंधारात
छाती धडधड धडधड करते



भीती वाटली तर
करायचं काय?
आजी सांगते
"घाबरायचं नाय
चल मी शिकवते
मंत्र भारी
भीती पळून
जाईल सारी"



अल्ला मंतर कोल्ला मंतर
तसाच मंत्र जंतर मंतर
कोणालाच नाही माहीत!
चला म्हणा माझ्याबरोबर

जंतर मंतर जंतर मंतर
भागम भाग भागम भाग
फटफट पळ तू भीती भित्तर
इथून पळ सूट भागम भाग

QR कोड स्कॅन करून हे गाणं ऐक.

आवडला का मंत्र मजेचा?
मी तर टाकला पाठ करून
पाठ करा चटचट पटपट
भित्तर भीती जाईल उडून

भीतीचा मंत्र

जंतर मंतर जंतर मंतर
भागम भाग भागम भाग
फटफट पळ तू भीती भित्तर
इथून पळ सूट भागम भाग

The Phurphur Phattack

Story - Nivedita Neelam I Illustrator - Shailja Jain

Every year, Maharani Dhampu travelled across her kingdom to meet her subjects. Everyone eagerly waited to see her. She sat by the window to get ready. Maids rushed to dress her in the finest silks and sparkling diamonds. A special fragrant rose powder was brought in to make her face glow! Her maid was about to apply this powder... Just then!

Dhad dhad dhadaaaaam Dhoom Dhoom Toorrrrrrrrrr Pook Dhoom!

A cloud of rose powder blew up in the air! Maharani Dhampu appeared, all covered in it... screaming! "It's an EARTHQUAKE!! Everyone, take cover!!!!! Just outside the window - Meenu, the royal elephant was chomping on a pile of bananas. What's this fuss all about? She wondered.



Later that day, the royal musicians were rehearsing on the parade ground. Mridangam, Nadaswaram and Khanjira players were part of this band.


Shambhu, the Nadaswaram player, wanted to practice. He took a deep breath in and was about to blow, when...



Phooorrrrrrrrrrr Phoooooooossssssssssssss
Dhooommmm Dhooooooooorrrrrrrrr

All the instruments broke down! What happened!?
"The sky is EXPLODING!!"
Shambhu yelled! All the musicians escaped!

What's this chaos? Meenu thought, as she slurped up sugarcane juice from the orchard near the ground. The next day... Maharaja Pumpu was monitoring the festive parade preparations. Soldiers were grooming their elephants and horses.



Just then a frightening Tutari sound echoed! The evil Raja Tampu's war cry could not be mistaken! Everyone got frightened! Who could save them? Just then, Meenu the royal elephant did something incredible! She let out a deafening, thunderous FART!

**Dhooorrrrrrrrrrrrrr.... Pooorrrrrrrrrrrrr....
Dhussssssssssss. Dhan Dhan Drrrrrrr Purrrrrrrrr
Phussssss. Booommmmmmm Bagad boooooom
dhoom dhoom**

The sound tore through the skies!
Raja Tampu and his army panicked! Was it a dangerous weapon?
The stinky smell made the enemy soldiers faint!
Raja Tampu signalled – "CEASE FIRE!!!"
His army got so scared; they rushed back without a fight!


Maharani Dhampu, Maharaja Pumpu and everyone cheered for Meenu! Hurray! Meenu's fart had saved the day!!



तुला काय वाटतंय?

डॉ. श्रुती पानसे | चित्र - अमृता वझे

तुला राग कधी येतो?
तुझा रागावलेला चेहरा इथे काढ




तुला भीती कधी वाटते? भीती वाटल्यावर
तुझा चेहरा कसा दिसतो? इथे काढ



तुझा बेस्ट फ्रेंड कोण आहे?
ती/तो तुला का आवडतो?




तुला कुठे फिरायला जायला आवडतं?
त्याचं इथे छोटंसं चित्र काढ.





तुला सगळ्यात जास्त आनंद
कधी झाला होता?



व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्ता

आपल्या भावना समजून घेणं या बुद्धिमत्तेमुळे शक्य होतं. लिहिता येणारी मुलं ही ॲक्टिव्हिटी स्वतः करू शकतील. अगदी लहान मुलांशी गप्पांमधून ही ॲक्टिव्हिटी आवर्जून करून घ्या.

मायमराठी


- वैशाली कार्लेकर
चित्र - इरा नागर

भीती वाटते तेव्हा...

भीती म्हटल्यावर तुला काय काय आठवतं? इथे लिही किंवा आई-बाबांना लिहायला सांग.







पालकांसाठी

भीती या भावनेचं शब्दक्षेत्र सांगणारा हा खेळ आहे. शब्दक्षेत्र म्हणजे एका शब्दाशी किंवा कल्पनेशी जोडलेले इतर शब्द/कल्पना आठवणे. शाळा, घर, खेळ, मित्र अशा कोणत्याही विषयावरचा हा खेळ घेता येईल. हा खेळ सर्जनशीलतेसाठी पोषक ठरतो.

रिक्षा




गोष्ट - अनुराधा कर्वे
चित्र - हबीब अली

रात्रीचे १२ वाजून गेले होते. मुसळधार पाऊस पडत होता. अधूनमधून विजा चमकत होत्या. तितक्यात बस स्टॅण्डवर एक बस येऊन थांबली. बसमधून अप्पा उतरले. गावापासून बस स्टॅण्ड लांब होता.

''आता रिक्षा कुठून मिळणार इतक्या रात्री?''



अप्पा पचँक पचँक करत निघाले. तितक्यात एक रिक्षा येताना दिसली. ''रिक्षा... रिक्षा...'' अप्पांनी आवाज दिला. रिक्षा काही थांबली नाही. थोडं पुढे त्यांना अजून एक रिक्षा दिसली. ''डायरेक्ट जाऊन बसतोच आता या रिक्षेत!'' असं म्हणून ते पळत निघाले. उडी मारून रिक्षात बसले. ''हुश्श..बरं झालं ही रिक्षा रिकामी निघाली!'' रात्रीची वेळ, बाहेर पाऊस, त्यामुळे रिक्षात अगदी अंधार होता आणि ती फार हळूहळू चालत होती.



तितक्यात झूऽऽऽप समोरुन एक मोटार वेगात गेली. आणि मोटारीच्या प्रकाशात अप्पांना जे दिसलं ते पाहून त्यांची बोबडीच वळली. पत्ता सांगण्यासाठी त्यांनी तोंड उघडलं होतं... पण समोर.... रिक्षात ड्रायव्हरच नव्हता!! रिक्षा हळूहळू चालत होती. झक.. झक.. झक.. झक..

अप्पा जाम घाबरले. ''रिक्षा कोण चालवतंय?'' त्यांनी झटपट बॅग घेतली आणि रिक्षेतून उडी मारली. पावसात भिजतच अप्पा गावाच्या दिशेने पळू लागले.



''काय हो. काय झालं?'' पुजाऱ्यांनी विचारलं. ''गुरुजी, अहो मी घरी जायला एका रिक्षेत बसलो होतो. रिक्षा पुढे पुढे जात होती पण त्यात ड्रायव्हरच नव्हता की हो!! उतरलो आणि पळत सुटलो.''''अरे देवा! या भागात भुतांचा सुळसुळाट झालाय. पाऊस काही आज थांबणार नाही. तुम्ही आजची रात्र इथेच राहा. इथे तुम्हाला काही होणार नाही. घाबरून, दमून अप्पा देवळातच झोपले. सकाळी गुरुजींनी त्यांना उठवलं. पाऊस थांबला होता. तोंड-हात-पाय धुऊन अप्पा घरी जायला निघाले. रिक्षानेच घरी जावं लागणार होतं. देवळाच्या बाहेर एक रिक्षा थांबली होती. अप्पांनी घाबरत घाबरत रिक्षात वाकून बघितलं. ''हुश्श!'' आत ड्रायव्हर होता. ''सदाशिवनगरला जायचंय. येणार का?'' अप्पा म्हणाले. ''बसा!'' रिक्षावाला म्हणाला. ''काय हो, या भागात भुतं आहेत का?'' अप्पांनी विचारलं. ''नाही ओ. लोक काहीही बोलतात.'' ''अहो, काल माझ्यासोबत एक विचित्रच गोष्ट घडली. रात्री १२ वाजता मी मागच्या चौकात एका रिक्षेत बसलो. रिक्षा अगदी हळू-हळू पुढे जात होती. मला वाटलं चला हळू तर हळू... पावसात रिक्षा तरी मिळाली. पण... पण... रिक्षेत ड्रायव्हरच नव्हता. रिक्षा आपोआप पुढे जात होती!''

हे ऐकताच रिक्षावाल्याने ब्रेक दाबला. खाड्कन मागे वळून तो म्हणाला, ''अहो, तो मीच होतो. काल पावसात माझी रिक्षा बंद पडली होती. मी ढकलत-ढकलत ती मेकॅनिककडे नेत होतो. तुम्ही माझ्याच रिक्षात चढून बसला होतात म्हणजे! रिक्षा ढकलायला किती जोर लावावा लागला मला!'' हे ऐकून अप्पांनी कपाळावर हातच मारला आणि दोघे खो खो हसत सुटले.



घाबरा घुबरा झेब्रा

कविता - अमृता कावणकर
चित्र - पूर्ती बापट

घाबरा घुबरा झेब्रा
त्याला भेटला कोब्रा

कोब्र्याने केलं फुस्स
झेब्र्याला झालं धस्स

म्हणाला मिस्टर कोब्रा
''कित्ती रे तू घाबरा घुबरा!

तुला मी डसणार नाही
गिळून मुळीच टाकणार नाही

आता चार दिवस मी सुस्त
इतका खाऊ केलाय फस्त

किंग कोब्रा मी सुपर कुल
झेब्राभाऊ, जस्ट चिल ड्युड!''



QR कोड स्कॅन करून हे गाणं ऐक.



छबी आणि बागुलबुवा

गोष्ट - नभा केसकर
चित्र - ओंकार मरकळे

छबीच्या घरी तिची मैत्रीण नंदू राहायला आली होती. नंदू आणि छबी खिडकीतून बाहेर बघत होत्या. घरासमोर रस्ता आणि रस्त्याच्या पलीकडे एक मोकळी जागा होती. तिथे खूप झाडं वेडीवाकडी वाढली होती.

''नंदू ते बघ, ते बघ... त्या तिथे काहीतरी हलतंय, इराक्का म्हणाली होती. तोच तो राक्षस असेल! बापरे, केवढे लांब हात आहेत त्याचे! त्याच्या हातात पानांचा गुच्छ आहे, तो हात हलवून आपल्यालाच बोलावतोय बहुतेक!'' छबी म्हणाली. नंदूची तर बोबडीच वळली. ती म्हणाली, ''मला तर पायपण दिसताहेत, पण त्याचे पंजे कुठे आहेत?'' ''अगं पंजे उलटे असतात म्हणे राक्षसांचे!'' तेवढ्यात नंदूच्या डोळ्यावर काहीतरी चमकलं. तिची घाबरगुंडी उडाली. ती पटकन टेबलाखाली जाऊन बसली. घाबरून तिने शाल डोक्यावरून घेतली.


''नंदू... राक्षसाचा दुसरा हात दिसला का तुला?'' असं म्हणत छबीने नंदूकडे पाहिलं, तर नंदू गायब... ''या लांब हाताच्या राक्षसाने नंदूला नेलं की काय??'' छबीने घाबरत सगळीकडे नजर फिरवली. टेबलाखाली कोणीतरी बसलेलं होतं. घाबरून छबीने भोकाड पसरलं!!

तो आवाज ऐकून शालीत लपून बसलेल्या नंदूला वाटलं, राक्षस छबीला उचलून नेतोय. नंदूने त्यापेक्षा जोरात व्या.. व्या.. करून भोकाड पसरलं. पलंगावर छबी आणि शालीच्या आतून नंदू जोरजोरात ''राक्षस राक्षस'' करून रडायला लागल्या. त्यांचा तो गोंधळ ऐकून बागुलबुवा तिथे आला.

‘‘काय झालं? का रडताय तुम्ही दोघी?’’ बागुलबुवाचा आवाज ऐकून दोघींना जरा धीर आला. त्याने दोघींना शांत केलं, पाणी दिलं. त्यांनी मग बागुलबुवाला सगळं सांगितलं. ‘‘वेड्या कुठल्या, कोणी सांगितलं तुम्हाला की तिथे राक्षस आहे?’’ ‘‘इराक्कानं... आणि आम्ही पाहिलंसुद्धा त्याला आत्ता!!’’ ‘‘असं? चला मग राक्षसाला जरा हाय हॅलो करून येऊ’’

‘‘काऽऽऽय??? बरा आहेस ना तू बागुलबुवा??’’ छबी म्हणाली. ‘‘पानांचा गुच्छ घेऊन तुम्हाला कोणीतरी हाय केलं ना? मग आपणपण हाय करू या त्याला, चला.’’ बागुलबुवाने मोठी बॅटरी घेतली. दोघी कशाबशा यायला तयार झाल्या. ‘‘तुला कशाला हवी बॅटरी? तू तर जादूने प्रकाश पाडू शकतोस ना?’’ छबीने विचारलं.

‘‘अं हं.. आज जादूला सुट्टी... कारण जादूची गरजच नाहीये मुळी.’’ बागुलबुवाचा हात धरून छबी आणि नंदू रस्ता ओलांडून गेल्या. बागुलबुवाने सगळीकडे बॅटरी फिरवली. ‘‘नंदू, तो पानांचा गुच्छ धरलेला हात दिसला होता ना तुला? कुठंय तो?’’ ‘‘हो.. दिसला होता, पण आता दिसत नाहीये!’’



''थांबा मी दाखवतो.'' असं म्हणत बागुलबुवाने एका फांदीवर बॅटरी वळवली, ''ही पाहा, पानं गळून गेलेली फांदी, तिच्या टोकाला थोडी पानं शिल्लक आहेत, हाच तो हात. आणि हे तुमच्या राक्षसाचे बिनपंजाचे पाय!'' असं म्हणत बागुलबुवाने शेजारी-शेजारी उभ्या असलेल्या दोन झाडांच्या बुंध्यांवरून बॅटरी फिरवली.
''आणि... आणि माझ्या डोळ्यावर चमकलं ते?'' नंदूने विचारलं.

''सोपं आहे. ती बघ मागे पायवाट. एवढ्या अंधारात कोणीही तिथून जात असेल तर बॅटरी घेऊनच जाणार. त्यांनी ती इकडे तिकडे फिरवली असेल आणि तुझ्या डोळ्यात चमकली असेल, समजलं?''

आता मात्र छबी आणि नंदूने हुश्श केलं. ''अस्सं होय!''
''हंम्म्म.. अस्सं, आता घ्या बॅटरीची शपथ आणि म्हणा, पुन्हा कधी अशा गोष्टींवर विश्वास ठेवणार नाही, कोणालाही घाबरवणार नाही आणि अंधाराला कधीच घाबरणार नाही.''
''हो, बॅटरीची शपथ आता भुतं-बितं, राक्षस-बिक्षस सगळ्यांना टाटा, बाय-बाय!''

बिल्लू राक्षसाला तीन डोळे आणि एक शिंग आहे. त्याचं नाक भोपळ्यासारखं आहे
आणि दात त्रिकोणी आहेत. कसा दिसत असेल बरं बिल्लू राक्षस?





गोष्ट - संहिता सहस्रबुद्धे
चित्र - ओंकार बागवे

एके दिवशी आई म्हणाली, ''माऊ, आज आपल्याला डॉक्टरकाकांकडे जायचंय हं!''
''टुचुक घ्यायला जायचंय? मी नाही येणार.'' माऊने भोकाड पसरलं. तिला इंजेक्शनची खूप भीती वाटायची.



आईने माऊला जवळ घेतलं, ''अगं वेडाबाई, घाबरु नकोस! तू तर केवढी स्ट्राँग आहेस. आपण दवाखान्यात जाऊन आलो की तुला सारखा-सारखा सर्दी, खोकलासुद्धा होणार नाही. आणि डॉक्टरकाका गंमतसुद्धा देणारेत!''



माऊच्या शरीराच्या आत बाऊ लपला होता. माऊचं रडणं ऐकून तो म्हणाला,

''हे हे हे.... अशीच रड माऊ. अजिबात जाऊ नकोस डॉक्टरकाकांकडे. म्हणजे मला तुला आजारी पाडता येईल. ही ही ही...''

आई माऊला दवाखान्यात घेऊन गेलीच. डॉक्टरकाकांना बघूनच माऊ मुसुमुसु रडायला लागली. डॉक्टरकाकांनी त्यांच्या मोठ्या चष्म्यातून माऊकडे बघितलं आणि मिशीतून हसले, ''हे काय! नदीला पाणी कमी झालंय का? म्हणून तू डोळ्यातून पाणी देतीयेस की काय?''

हे ऐकून माऊ गालातल्या गालात हसली. तिने डोळे पुसले. डॉक्टरकाका म्हणाले, ''मला सांग तू कधी कुठल्या किल्ल्यावर गेली आहेस का?''



‘‘अरे वाह! मग तुला एक गंमत सांगतो. तुझं शरीर आहे ना, तेसुद्धा एक किल्लाच आहे. आज त्या किल्लयात आपण सुपरहिरो सैनिक पाठवणार आहोत. ते बाऊसारख्या शत्रूंपासून तुझं रक्षण करतील. हे बघ मी या नळीत ते सैनिक भरलेत.’’



‘‘पण मला दुखेल ना!’’ इतकुसा चेहरा करून माऊ म्हणाली. ‘‘तू इतकी शूरवीर आहेस, तुला हे टुचुक कळणारसुद्धा नाही.’’ ‘‘प्रॉमिस?’’ माऊने विचारलं. ‘‘प्रॉमिस!’’ माऊची पाठ थोपटत डॉक्टरकाका म्हणाले. माऊला थोडी भीती वाटतच होती, पण तिने डोळे घट्ट मिटले. आईने तिचा हात धरला. डॉक्टरकाका म्हणाले,

‘‘आता मोठ्ठा श्वास घे.. १.. २.. आणि...’’ ‘‘उई....’’




‘‘झालं!’’ असं म्हणत डॉक्टरांनी डबीतून दोन श्रीखंडाच्या गोळ्या काढून माऊच्या हातावर ठेवल्या.
‘‘फर्स्ट क्लास. काही झालं तरी का?’’
‘‘थोडंच दुखलं! अगदी मुंगी चावल्यावल्यासारखं! आता सुपरहिरो सैनिक माझ्या आत गेलेत. मी अजूनच स्ट्रॉंग झालीये!’’ माऊ हसत म्हणाली. तिकडे आत... सुपरहिरो सैनिकांना बघून बाऊ जाम घाबरला.

‘‘बापरे! सुपरहिरो सैनिक! आता माझं काही खरं नाही! भागोऽऽऽ’’ माऊ लागली हसायला आणि बाऊ लागला रडायला!

Nature and मी

गोष्ट - गिरीश जठार
चित्र - गिरीश मालप



जंगलात एक मोठं जांभळाचं झाड होतं. झाडावरच्या ढोलीत एक खारू राहायची. साधीसुधी नाही. तरंगणारी खारू होती ती! हात पाय पसरून ती उडी मारायची. एका झाडावरून दुसऱ्या झाडावर अलगद तरंगत जायची. खारू होती चुळबुळी आणि एकदम बिनधास्त.

जांभळाच्या झाडाच्या बुंध्याशी, खोबणीत एक पिटुकला प्राणी राहायचा. त्याचं तोंड उंदरासारखं आणि बाकी शरीर हरणासारखं होतं. सगळे त्याला ''माऊस डियर'' किंवा पिसूरी हरीण म्हणायचे. दिवसभर तो दडून बसायचा आणि रात्री खाऊ शोधायला गुपचूप बाहेर पडायचा. जराकुठे खुट्ट झालं की घाबरून गुडूप व्हायचा.''

एके दिवशी माऊस डियरला कुठल्यातरी शिकारी प्राण्याचा वास आला. मोठ्या डोळ्यांनी त्याने दूरवर पाहिलं. तिथे बिबटया होता. माऊस डियरने खारूला हाक मारली, ''खारू ऽऽऽ बिबटया येतोय. जा ढोलीत लप. मी तर सटकतोय!'' ''त्याला कशाला भ्यायचं! जवळ येईल तेव्हा बघू.'' खारू झाडावरच फिरत बसली.



बिबटया आला. जांभळाच्या झाडावर चढला. त्याने जांभई दिली आणि तो झोपी गेला. जरा वेळाने डुलकी काढून निघून गेला. तो गेल्यावर माऊस डियरने हळूच डोकं बाहेर काढलं. तितक्यात.. ''भॉकऽऽ'' खारू जोरात ओरडली. माऊस डियर दचकला, ''वेडी आहेस का खारू? घाबरलो ना मी!''

खारू म्हणाली,''तू तर अगदी भित्रीभागूबाई आहेस. माझ्यासारखं जरा बिनधास्त राहायला शिक की!'' माऊस डियर म्हणाला, ''आहे मी भित्रीभागूबाई! पण भीतीच माझं रक्षण करते. खारू, तू झाडावर राहतेस. तुझे शत्रूपण कमी आहेत. मला सतत धोका असतो. बिबटे, तरस, कोल्हे, वाघ टपूनच असतात. गरुडासारखे शिकारी पक्षीसुद्धा कधीही हल्ला करू शकतात माझ्यावर. ही भीती मला सांगते ''आवाज येतोय बघ! शत्रूचा वास येतोय सावध हो! धोका आहे पळ!'' ती आहे म्हणून मी आहे. मी तुझ्यासारखा बिनधास्त राहिलो तर दुसऱ्या मिनिटाला माझा कोणीतरी फडशा पाडणार हे नक्की!'' ''बापरे... जरा जास्तच शत्रू आहेत रे तुझे. तुला सावधच राहावं लागणार. आहेस तू भित्रीभागूबाई... पण चपळ आणि चतुरही आहेस की! तुझं बरोबर आहे, तुझ्यासाठी तरी डरना जरुरी है.'' खारू म्हणाली. ''चल मी लपतो आता. बिबटया परत येताना दिसतोय मला.'' माऊस डियर म्हणाला. ''कुठंय? मला तर काही दिसत नाहीये!''

''अगं माझे डोळे मोठ्ठे आहेत. मला लांबचं नीट दिसतं. रात्रीसुद्धा!

चल मी निघालो. टाटा!''
माउस डियर झुडपात शिरला आणि
खारू तुरुतुरु झाडावर निघाली.







चिंची चेटकीण

कविता - मृदुला अर्जुनवाडकर
चित्र - स्मृती मुदगल

चिंची चेटकीण नाव आहे तिचं
डोळ्याबाहेर तिच्या लोंबते बुबुळ

भूक लागल्यावर चिंची मात्र
चोरून खाते चिंच आणि गूळ

चिंचेच्या झाडावर लटकते उलटी
तिला फार आवडते वटवाघूळ

चिंचीच्या गळ्यात बोरांच्या माळा
चिंचीला आवडतात पोरांच्या शाळा



चिंचीच्या पायात उलटी चप्पल
एकटक बघताच पडते टक्कल

QR कोड
स्कॅन करून
हे गाणं ऐक.

चिडवले तिला तर घेते सूड
चाटते तुमच्या नाकाचा शेंबूड

डोक्यावर तुमच्या वाजवते तबला
तिरकिट धा तिरकिट धा, धाधाधा

कानात तुमच्या किंचाळते अशी
आकाशात उडायला लागतात म्हशी

चिंचीचा आहे असा दरारा
चिंच खायला घाबरतो गाव सारा

